# मी कोण ?

खरं तर प्रत्येकाला मी कोण ? हे माहीत असतं।

पण आपल्याच दोषांसकट आपलं अस्तित्व मान्य नसतं ।

रोज रात्री झोपण्यापूर्वी त्याची जाणीव होऊनच झोप येते।

दोषांवर फुंकर घालून निद्रादेवीला आमंत्रण द्यावे लागते।

मग हळूच सर्वच विसरून स्वप्नांच्या दुनियेत प्रवेश होतो।

निद्रेपूर्वीचा 'मी कोण'? हा क्षण केंव्हाच विरघळून जातो।

स्वप्नदुनियेची रंजकता, तरलता संपूच नये असं वाटतं।

'मी कोण' विसरण्याचा परमोच्च क्षण पुसटसा भेटतो।

शरीरचक्र जागरूक होते अन स्वप्न तिथेच संपते।

वर्तमानात परतत 'मी नक्की कोण' हे सत्य बोचते।

निद्रेपूर्वीचा 'मी कोण 'आणि निद्रेनंतरचा 'मी कोण'

ह्यातले अंतर फार वाटू लागते।

एक सत्य अबाधित राहते,

'मी कोण' हे सुरवातीपासूनच माहीत असते।

आशा अग्निहोत्री।

मला खालील कविता कुणीतरी पाठवली. ती वाचून मला वरील कविता प्रतिसाद म्हणून सुचली

आणि अर्थातच मी ती आपल्या सर्वांना सदर केली आहे.

धन्यवाद

आशा अग्निहोत्री

*माणूस* दिसायला ..
इतका खराब नसतो ..
जितका तो ..
*आधार कार्डा*वर दिसतो,
😂😂😂😂😂😂😂😂

अन् ...
इतका *देखणा* ही नसतो
जितका तो
*वोट्सअपच्या डीपी*
मधे दिसतो..
😂😂😂😂😂😂😂😂😂

*माणूस* इतका
*वाईट* पण नसतो,
जितका ..
त्याची *बायको* समजते..

अन् ..
इतका *चांगला* पण नसतो,
जितकी
त्याची *आई* समजते..!!
😂😂😂😂😂😂😂😂

पण,
तो *नक्की कसा असतो?*
हे फक्त त्याच्या ..
*मित्रांनाच ठाऊक असते* ...
😂😂😂😂😂😂😂😂😂

(ही कविता जालावरून)

**- आशा अग्निहोत्री**